# भौतिक सुखांसाठी वखवखलेला समाज संस्काराच्या मर्यादा ओलांडतो तेव्हा शेवटी वनवास घडतो

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

आपण रामायण वाचत लहानाचे मोठे झालो. आदर्श राज्यकर्ता, आदर्श पत्नी, आदर्श भक्त असे सर्व संस्कार रामायणाच्या वाचनातूनच आपल्यावर झाले. मनावर योग्य संस्कार घडवत एक सुदृढ समाज निर्माण करण्याचा यामागे हेतू होता. वाल्याचा वाल्मीकी झाला आणि आपल्या अनुभवातून बऱ्यावाईटाची अनुभूती झालेल्या वाल्मीकी मुनींनी रामायणाची रचना केली. प्रभू श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान खरोखरच अस्तित्वात होते की नाही यावर वाद होऊ शकतो. पण एक बाब वादातीत आहे. वाल्याचा वाल्मीकी व्हावा आणि समाजात वाल्मीकीचा आदर्श राहावा याकरिता संस्कारांचे शिंपण करायचे हाच रामायण साकारण्याचा हेतू होता.

आज मात्र रामाचे नाव केवळ ओठांवर राहिले आहे. रामाचे रूप मनात नाही तर भिंतीवरील तस्विरीत बंदिस्त झाले आहे. रामाच्या आयुष्यातील प्रत्येक घटनेतून वाल्मीकींनी जो संदेश दिला आहे तो विसरून ती घटना केवळ चित्र रंगविण्यापुरती शिल्लक राहिली आहे. रामजन्म साजरा करण्यात कोट्यवधी उधळले जातात, पण आपुलकीच्या भावनेने एकाही अहिल्येच्या जीवनाला सुखाचा स्पर्श केला जात नाही. राममंदिर बांधण्याचा संकल्प करतो आहोत. परंतु समाज मंदिरात रामाने दाखविलेल्या मार्गावर वाटचाल करणाऱ्यांची संख्या कमी होत चालली आहे.

रामायण ही साधी कथा नाही. समाजातील प्रत्येक घटकाला त्याची मर्यादा दाखवून सुखी, आनंदी समाजाचा मार्ग दाखविणारी ती गाथा आहे. परंतु आज जे घडत आहे ते सर्वात धोकादायक आहे. सोनेरी हरणाच्या हव्यासाने सीतेने मर्यादा ओलांडली आणि संपूर्ण समाजावर संकटे कोसळत गेली. दुर्दैवाने एक समाज म्हणून आपण आज तेच करीत आहोत. भौतिक सुखांच्या मागे लागून आपण मर्यादेच्या चौकटी तोडत चाललो आहोत. चांगले काय आणि वाईट काय याची सीमारेषा याच भौतिक हव्यासापोटी धुसर झाली आहे. आपल्या कुटुंबाच्या चैनीसाठी आपण इतर सर्व कुटुंबांचे सुख ओरबाडायला तयार झालो आहोत. पैसा हा संस्कारांपेक्षा मोठा झाला आहे. वरण भातावर तृप्तीचा ढेकरच येत नाही. सतत आणखी काही हवं असतं. त्यामुळे या समाजाचे विघटन होऊन प्रत्येक कुटुंबाची वखवखलेली बेटं तयार झाली आहेत. पैसा आणि सत्ता मिळत असेल तर त्यासाठी केली जाणारी वाटेल ती पापं आपणच माफ करीत आहोत. याचा जो परिणाम होणार तोच होतो आहे. सर्वच जण लाज सोडून वागू लागले आहेत. हे जे चालले आहे ते तात्पुरते सुख देणारे असेलही, पण त्याचा शेवट वाईटच होणार आहे.

आज दुर्दैव असे आहे की, वाल्याचा वाल्मीकी झाला तर त्याला बावळट, मूर्ख मानले जाऊ लागले आहे. पण वाल्याचा जर आणखी बलवान, आणखी क्रूर हैवान वाल्या झाला तर त्याची किंमत वाढते आहे. कारण हा वाल्या वखवखलेल्या कुटुंबांपुढे चार दाणे टाकून त्यांना कब्जात ठेवतो आणि मग त्या कुटुंबांना वापरतो. आपण वापरलो जात आहोत हे त्या कुटुंबांना कळत असते. पण हव्यासापुढे सर्व गोष्टी क्षुल्लक वाटू लागतात. या अशा कुटुंबांमुळेच वाल्या मोठा होत चालला आहे. तोच आदर्श वाटू लागला आहे. लुटारू नेता तुरुंगातून सुटून बाहेर आल्यावर फटाके वाजवून समाज त्याचे स्वागत करतो. आपला समाज सत्यानाशाच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे.

काय सुरू आहे या समाजात? सर्वोच्च न्यायव्यवस्था संशयाच्या भोवऱ्यात आहे. कठुआ बलात्कार प्रकरण ही साधी घटना आहे असे काश्मीरचा उपमुख्यमंत्री जाहीरपणे बोलतो, मी दलिताच्या घरी जेवलो हे फार मोठे महान कार्य केल्याप्रमाणे सांगताना एकाही नेत्याला लाज वाटत नाही, कुपोषित बालके मरतात हे वाक्य सहजपणे उच्चारले जाते, एका राज्याला पाणी देण्याचा आराखडा तयार नाही, कारण नेता सभा घेतो आहे. आपल्या महाराष्ट्रात काय सुरू आहे? भ्रष्ट, चोर, गुंड, दरोडेखोर खुलेआमपणे निवडणुका लढवू लागले आहेत. सत्तेच्या खुर्च्या उबवू लागले आहेत. 'चारा छावण्याचा घोटाळा' केला म्हणून ज्यांच्यावर भयंकर आरोप झाले त्यांना भाजपाने उमेदवारी दिली, अख्खा रायगड स्वतःच्या खिशात घालण्याचे पाप केल्याचा आरोप असलेल्या नेत्याला राष्ट्रवादीने राष्ट्रीय कार्यकारिणीत घेऊन त्यांच्या मुलालाही तिकीट दिले, वीज कंपनीचे बुडालेले पैसे माफ करून घेतलेला नेता सभागृहात बोलतो, हाती भगवा घेऊन फिरणारे भूमाफिया निघतात, दुसऱ्यांच्या जमिनी एजंट पाठवून घेणाऱ्यांचे पुनर्वसन होते, रिक्षावाल्याचा कोट्यधीश बिल्डर होतो आणि डाळींचा काळाबाजार करणारा खुर्चीतच टिकून राहतो.

हे गुंडपुंड असे उघडपणे भ्रष्टाचार करून मिरवतात आणि सत्तेची उमेदवारी मिळवतात याचे दुःख तर आहेच. पण त्याहीपेक्षा चिंता आहे. कारण गुंडगिरी आणि भ्रष्टाचार उघडपणे करण्यापर्यंत यांची मजल गेली आहे. समाज काय म्हणेल याची त्यांना भीतीच उरली नाही आणि मनात लाज शिल्लक नाही. कट्टर दुश्मन बनून जनतेला फसविणारे जेव्हा खुर्ची दिसताच एकमेकांना भाऊ म्हणू लागतात तेव्हा त्यांचा राग येत नाही. या गोष्टीचा राग येतो की जनतेची अशी उघड फसवणूक करण्याची मस्ती त्यांच्यात आली आहे. ही मस्ती आणि ही मिजास या गुंडपुंडात आली आहे, कारण समाज विकत घेता येतो याची त्यांना खात्री झाली आहे. किंबहुना काहींना हे वागणं मान्यही असते, हे त्यांना माहीत आहे. आपण कसेही वागलो तरी समाज आपले काही करणार नाही असा त्यांना पूर्ण विश्वास वाटू लागला आहे. आपण काहीही बोललो तरी दोनचार दिवसांत समाज सर्व विसरून जाईल याची त्यांना शाश्वती आहे. भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या समाजातील या वखवखलेल्या कुटुंबांपुढे नोटांची पुडकी फेकली की झाले. आपण काही करायला मोकळे होणार हे या गुंडापुडांनी ताडले आहे. हे नेते वाटेल ते बोलतात, हवी तशी गद्दारी करतात, महिलांशी गैरवर्तन करतात, ब्लॅकमेलिंग करतात, शिव्या देतात, भ्रष्टाचार करून कोट्यधीश होतात, मनात येईल त्या घोषणा करतात हे तर वाईटच आहे. पण हा नंगानाच ते उघडपणे करू लागले आहेत हे अधिक वाईट आहे. पैशाच्या जोरावर आपण काहीही करू शकतो हा त्यांचा आत्मविश्वास वाढत चालला आहे.

समाज पैशाला सर्वात मोठा मानू लागला आहे ही गोष्ट ते जाणतात. ही विषारी कीड आहे, पण त्याहीपेक्षा विषारी आपण आहोत. कारण आपण हे सर्व चालवून घेतो. त्यांचा दोष नाही कारण ते तर सैतानच आहेत. आपला दोष आहे कारण आपण हे सैतान पोसतो आहोत. आपल्याला वाल्मीकीची कदर नाही. आपल्याला पैसेवाला वाल्या मोठा वाटू लागला आहे. त्यांनी मर्यादा ओलांडल्या आहेत, पण आपणही मर्यादा पुसून टाकल्या आहेत. आपल्यासाठी संस्कार हा हेटाळणीचा विषय झाला आहे. जेव्हा कोणत्याच गोष्टीची मर्यादा राहात नाही तेव्हा विनाशाकडे वाटचाल सुरू होते. स्वतःच्या कुटुंबाच्या चार क्षणांच्या भौतिक सुखाच्या लालसेने आपण संस्काराच्या मर्यादा तोडून विनाशाकडे चाललो आहोत. रामायणातून काहीच बोध घेणार नसू आणि कल्पनेतील सोनेरी हरणामागेच धावण्याचा निर्णय असेल तर शेवट वनवासच आहे. रावण हा रामापेक्षा मोठा वाटू लागला, वाल्मीकींपेक्षा वाल्या आदर्श वाटू लागला तर ऱ्हास होणारच आहे.